# विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१,

**१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.**

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं.- ०२०- २६१२२२१७

ई मेल आय डी क्र. dydpune @ gmail.com वेब साईट- www.dydepune .com


**अत्यंत महत्त्वाचे**

जा.क्र.शिउसं/उमाशि-२/संच मान्यता/ २०१६

दिनांक :- 15 NOV 2016

प्रति,

प्राचार्य/प्राचार्या,
सर्व कनिष्ठ महाविद्यालय/ उच्च माध्यमिक/
वरिष्ठ महाविद्यालय सलंग्न कनिष्ठ महाविद्यालय, पुणे विभाग पुणे

**विषय :- सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता उच्च माध्यमिक शाळांच्या संच मान्यता ऑफलाईन पध्दतीने करणेबाबत**

**संदर्भ :-१ दि.१८.१०.२०१६ रोजी मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, पुणे येथे झालेल्या सहविचार सभेमध्ये दिलेली सुचना**
२ जा.क्र.शिउसं/उमाशि-२/संच मान्यता २०१६-१७/२०१६ दि.२१.१०.२०१६

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, पुणे विभागाची सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांची संच मान्यता व कार्यभार निश्चिती ऑफलाईन पध्दतीने करण्यात येणार आहे. त्याचे वेळापत्रक यापुर्वीच प्रसिध्द करण्यात आलेले होते. सदर संच मान्यता शिबीरात तक्ता अ मधील कायम शिक्षक त्याचप्रमाणे तक्ता ब व तक्ता क मधील नियुक्त शिक्षकांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता मान्यता देण्यात येणार आहे. त्यासाठी खालील प्रमाणे शिक्षक मान्यतेसाठी कागदपत्रे सादर करावीत.

**प्रकार :- तक्ता अ (अनुदानित)**

१) शैक्षणिक वर्ष २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६ ची शिक्षक मान्यता प्रत

२) बदलीने नियुक्त झालेल्या शिक्षकाची मुळ शिक्षक मान्यता प्रत, बदली आदेश, रुजु अहवाल, बदली मान्यता आदेश, पुर्वीच्या कनिष्ठ महाविद्यालयातील/ विभागातील शिक्षक मान्यता प्रत

३) शैक्षणिक वर्ष २०१५-१६ च्या अखेरीस किंवा शै.वर्ष २०१६-१७ च्या सुरुवातीस सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांचे सेवा समाप्ती आदेश,

**प्रकार :- तक्ता ब (अनुदानित)**

१)शिक्षण सेवक मान्यता आदेश,

**प्रकार :- तक्ता क (अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित)**

१) संस्था ठराव, २) अर्धवेळ/प्र.घ.ता. नियुक्ती आदेश / रुजु अहवाल,

३) नवीन नियुक्ती असल्यास शैक्षणिक आर्हता प्रमाणपत्रे (पदव्युत्तर पदवी (MA/M.Com/ M.Sc) व व्यवसायिक आर्हता (B.Ed, M.Ed, B.Ped, M.Ped) व जे लागु असेल ते

४) शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील अर्धवेळ /प्र.घ.ता. शिक्षकाचे नियुक्ती २०१६-१७ मध्ये कायम ठेवली असेल तर अशा शिक्षकांची शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील शिक्षक मान्यता प्रत

५) ज्या अर्धवेळ शिक्षण सेवकाचा अर्धवेळ शिक्षण सेवक कालावधी पुर्ण झाला असेल अशा शिक्षकांच्या बाबतीत संस्था ठराव, वेतनश्रेणीतील नियुक्ती आदेश, रुजु अहवाल, आणि मागील तीन वर्षाच्या अर्धवेळ शिक्षण सेवक मान्यता प्रती सादर कराव्यात.

तक्ता अ,ब,क मधील शिक्षकांच्या नियुक्तीबाबत कोणतीही तक्रार किंवा वाद त्याचप्रमाणे न्यायालयीन प्रकरण नसल्याबाबतचे प्रमाणपत्र संबधित प्राचार्य यांनी सादर करावे. सदर बाबत भविष्यात कोणतीही तक्रार अगर न्यायालयीन प्रक़रण उद्‌भवल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी प्राचार्य यांची राहील.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रतः-**

**शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. पुणे/अहमदनगर/सोलापूर**